महासागर



# कर्नल सुधीर सावंत यांचा स्वातंत्र्य कोकण अभियानाला जाहीर पाठिंबा



मुंबई, दि. ४ प्रतिनिधी

कोकणचे नेते मा. आमदार, खासदार कर्नल सुधीर सांवत साहेब यांची आज भेट घेऊन स्वतंत्र कोकणराज्य विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. माननीय कर्नल सुधीर सांवत. यांनी स्वतंत्र कोकणराज्य अभियानाला जाहीर पाठिंबा देऊन त्यांची सल्लागार पदांसाठी निवड करण्यात आली. या बैठकीला संजय कोकरे अध्यक्ष/संस्थापक. धनंजय कुवसेकर, मुंबई अध्यक्ष, विभागीय नेते मुरलीधर करंगुटकर, सुभाष राणे, राजेंद्र सुर्वे, विजय पवार उपस्थित होते. कर्नल सुधीर सावंत यांची सल्लागार पदी निवड झाल्याबद्दल समिती तर्फे अभिनंदन करण्यात आले.

# आपत्तीग्रस्तांसाठी दिलासा!

## घरांच्या दुरुस्तीसाठी ४९ कोटींचा निधी मंजूर; विभागीय आयुक्तांना तातडीने वाटपाचे आदेश

मुंबई, दि. ४ प्रतिनिधी

नैसर्गिक आपत्तीमुळे घरांचे नुकसान झालेल्या हजारो कुटुंबांना मोठा दिलासा देणारा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. दुरुस्ती आणि पुनर्बांधणीसाठी ४९ कोटी रुपयांचा निधी मंजूर करत सर्व विभागीय आयुक्तांना तातडीने वितरीत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ही माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली.

जाधव-पाटील म्हणाले, "आपत्तीग्रस्त कुटुंबांना मदत मिळेपर्यंत वेळ लागतो, त्यामुळे तातडीने निधी मिळावा यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे." या निर्णयानुसार राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या (एसडीआरएफ) नियमांनुसार प्रत्येक विभागासाठी निधीचे वाटप करण्यात आले आहे.

मंत्री जाधव-पाटील म्हणाले, "नैसर्गिक आपत्तींमध्ये बाधित झालेल्या नागरिकांचे पंचनामे पूर्ण होऊन प्रस्ताव आल्यानंतर निधी वितरित करण्यात येईल. या निधीमुळे घरांची तातडीने दुरुस्ती व पुनर्बांधणी शक्य होईल."

राज्यात अनेक ठिकाणी अवकाळी पावसामुळे वादळ, पूर, ढगफुटीमुळे घरांची पडझड आणि मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाने आताच पुढाकार घेऊन निधीची तरतूद केल्यामुळे भविष्यातील आपत्तींना सामोरे जाण्यासाठी यंत्रणांना बळ मिळणार आहे. एकूणच, शासनाचा हा निर्णय आपत्तीमुळे उध्वस्त झालेल्या कुटुंबांसाठी नवी आशा घेऊन येत आहे.

विभागनिहाय निधी वाटप कसे?

| विभाग | मंजूर निधी (रु. कोटीत) |
|---|---|
| कोकण | ५ |
| पुणे | १२ |
| नाशिक | ५ |
| छत्रपती संभाजीनगर | १२ |
| अमरावती | ५ |
| नागपूर | १० |
| एकूण | ४९ कोटी |

# मुंबई विमानतळावर सुरक्षारक्षक आणि वाहनचालकांमध्ये राडा

मुंबई, दि. ४ प्रतिनिधी

मुंबई विमानतळावर सुरक्षारक्षक आणि वाहनचालक यांच्यात जोरदार राडा झाला. या घटनेची माहिती मिळताच पोलीस अधिकारी आणि सीआयएसएफ कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पोहोचून हा वाद मिटवला. त्यानंतर त्यांना चौकशीसाठी नेण्यात आले. पार्किंगच्या वादातून हा वाद झाल्याचे सांगण्यात येत आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे.

ही घटना मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पार्किंग परिसरीत घडली. मिळालेल्या माहितीनुसार, वाहनचालकाने वाहन चुकीच्या पद्धतीने पार्क केल्यानंतर सुरक्षारक्षाकाने त्यांना हटकले. त्यामुळे त्यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली. काही वेळातच शाब्दिक वादाचे रुपांतर हाणामारी झाले. यावेळी दोन्ही गटातील लोकांनी एकमेकांना लाथा-बुक्क्यांनी तसेच जमिनीवर लोळवून कपडे फाटेपर्यंत मारहाण केली.

या घटनेची माहिती मिळताच एका पोलीस कर्मचाऱ्याने घटनास्थळी धाव घेऊन दोघांमधील वाद मिळवण्याचा प्रयत्न केला. परंतु, हाणामारी करणाऱ्यांची संख्या जास्त असल्याने एकटा पोलीस कर्मचारी काहीच करू शकला नाही. त्यानंतर सहारा पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थिती नियंत्रणात आणली.याप्रकरणी दोन्ही गटांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, या घटनेने विमानतळ परिसरात एकच गोंधळ उडाला.

# म्हाडाच्या अतिधोकादायक इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना 20 हजार भाडे देण्याचा निर्णय

मुंबई, दि. ४ प्रतिनिधी



म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारितील उपकरप्राप्त इमारतींच्या पावसाळापूर्व सर्वेक्षणात ९६ अतिधोकादायक इमारती आढळल्या आहेत. या इमारतींमधील रहिवाशांना भाड्याने घर घेण्यासाठी दरमहा २० हजार रुपये भाडे अदा करण्याचा निर्णय 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी जाहीर केला आहे. त्याचप्रमाणे बाह्य यंत्रणेमार्फत तीन वर्षांकरिता १८० ते २५० चौरस फूट क्षेत्रफळाचे ४०० गाळे अतिधोकादायक इमारतींतील भाडेकरू रहिवाश्यांकरिता भाडेतत्त्वावर घेण्याबाबत जाहिरात देण्याचे निर्देशही मंडळास दिले आहेत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे पावसाळापूर्व सर्वेक्षणात ९६ इमारती अतिधोकादायक म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. या अतिधोकादायक इमारतींमध्ये सुमारे २४०० रहिवासी वास्तव्यास असून त्यांना तातडीने संक्रमण शिबिरात स्थलांतरित करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत मंडळाकडे फक्त ७८६ संक्रमण गाळे उपलब्ध असल्याने अतिधोकादायक इमारतींमधील रहिवाशांना तात्पुरत्या स्वरूपात संक्रमण शिबिरांतून पर्यायी निवासाची व्यवस्था देणे मंडळास शक्य नाही. त्यामुळे पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर रहिवाशांच्या जीवितास धोका पोहचू नये व त्यांची मुंबईत इतरत्र निवासाची पर्यायी व्यवस्था देणे आवश्यक असल्याने 'म्हाडा'चे उपाध्यक्ष जयस्वाल यांनी हा निर्णय घेतला आहे.

दोन्ही प्रकारे होणारा खर्च सदर इमारतीच्या जागेवर पुनर्विकासासाठी खासगी विकासकांना, सहकारी गृहनिर्माण संस्था यांना विकासासाठी दिल्यास सदर विकासकांना ज्या दिवसापासून मंडळामार्फत प्रतिमाह २० हजार भाडे अदा करण्यात आले आहे अथवा बाह्य यंत्रणेमार्फत तीन वर्षांकरिता १८० चौरस फूट ते २५० चौरस फूट क्षेत्रफळाचे ४०० गाळे भाड्याने घेतलेले आहेत, त्याचा देखभालीसह संपूर्ण खर्च विकासकाने व सहकारी गृहनिर्माण संस्था यांनी भरणे बंधनकारक राहील, असाही निर्णय जयस्वाल यांनी घेतला आहे.

मुंबई शहर जिल्ह्यात आता प्रत्यक्ष अस्तित्वात असलेल्या उपकरप्राप्त इमारतींची संख्या एकूण १३ हजार ९१ आहे. मंडळाकडे २० हजार ५९१ संक्रमण गाळे आहेत. उपकरप्राप्त इमारती पडणे, धोकादायक म्हणून जाहीर करणे किंवा इमारतीची संरचनात्मक दुरुस्ती अशा विविध कारणांसाठी रिकाम्या करण्यात येणाऱ्या उपकरप्राप्त इमारतीमध्ये वास्तव्य करीत असलेल्या रहिवाश्यांना तात्पुरत्या स्वरूपात निवासाची पर्यायी व्यवस्था करण्याच्या दृष्टीने मंडळामार्फत शहरात व उपनगरात संक्रमण शिबिरामध्ये गाळे उपलब्ध करण्यात येतात.

# कोकण रेल्वेच्या पावसाळी वेळापत्रकात सुधारणा

## प्रवाशांचा प्रवास होणार वेगवान

मुंबई, दि. ४ प्रतिनिधी

मुसळधार पाऊस कोसळू लागताच दृश्यमानता कमी होऊन रेल्वेगाड्यांच्या वेगावर नियंत्रण ठेवावे लागते. तसेच वीर – उडुपी दरम्यानच्या ६४६ किमी मार्गावर वेगमर्यादा लागू करण्यात येते. त्यामुळे पावसाळ्यात रेल्वेगाड्या कूर्मगतीने धावतात. दरवर्षी कोकण रेल्वेचे पावसाळी वेळापत्रक १० जून ते ३१ ऑक्टोबर दरम्यान लागू होते. मात्र, यावर्षी पूर्वपावसाळी आणि अन्य पूर्ण झाल्याने कोकण रेल्वेने पावसाळी वेळापत्रकात सुधारणा केली आहे.

पावसाळी वेळापत्रक १० जूनऐवजी १५ जूनपासून लागू करण्यात येणार आहे. तर, पावसाळी वेळापत्रकाची मुदत २० ऑक्टोबरपर्यंतच असणार आहे. पावसाळी वेळापत्रकात १५ दिवस कमी केल्याने प्रवाशांचा प्रवास वेगवान होणार आहे. कोकण रेल्वेने कोलाड – ठोकूर दरम्यानच्या ७४० किमी पट्ट्यातील पूर्वपावसाळी कामे पूर्ण केली आहेत.

पावसाळ्यात कोकण रेल्वे मार्गावर दरड कोसळण्याचा धोका असतो. दरड कोसळण्याच्या घटनांमुळे रेल्वेगाड्या खोळंबतात. तसेच मोठा रेल्वे अपघात होण्याची शक्यता असते. त्यामुळे यावर्षी कोकण रेल्वे प्रशासनाने धोकादायक वाटणाऱ्या दरडी काढून टाकण्याची कामे केली आहेत. यासह बोगद्याजवळ, दरडीच्या ठिकाणी लोखंडी जाळ्या बसविल्या आहेत. यासह संपूर्ण कोकण रेल्वे मार्गावर ६३६ कर्मचारी २४ तास गस्तीवर असणार आहेत. आपत्कालीन स्थितीत तात्काळ मदत मिळावी यासाठी ठराविक अंतरावर अत्याधुनिक यंत्रणा सज्ज ठेवण्यात येणार आहेत.

# कचरा उपविधीबाबत मुंबईकरांकडून 2700 सूचना व हरकती

मुंबई, दि. ४ प्रतिनिधी

कचरा, स्वच्छतेबाबत शाळांमध्ये नागरी शिक्षण द्यावे, त्याचबरोबर नागरिकांकडून रोख रकमेऐवजी ऑनलाईन पद्धतीने दंड वसूल करण्याची सूचना नागरिकांनी मुंबई महानगरपालिकेला केली आहे. महानगरपालिका प्रशासनाने घनकचरा व्यवस्थापन उपविधी – २०२५ बाबत मुंबईकरांकडून सूचना व हरकती मागविल्या होत्या. त्यानुसार, संपूर्ण मे महिन्यात मुंबईकरांकडून महापालिकेला २ हजार ७०० सूचना व हरकती प्राप्त झाल्या असून बहुसंख्य नागरिकांनी वरील सूचना केल्या आहेत.

मुंबई महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन उपविधी २०२५ बाबत १ ते ३१ मे या कालावधीत मुंबईकरांकडून सूचना व हरकती मागविल्या होत्या. या प्रक्रियेसाठी विविध स्थानिक संस्थांची मदत घेण्यात आली. घनकचरा उपविधीच्या धोरणनिर्मितीत मुंबईकरांच्या सूचना लक्षात घेऊन त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महापालिकेने नागरिकांकडून सूचना व हरकती मागविल्या होत्या. त्यानुसार, व्हाट्स ॲप चॅटबॉट, पालिकेचे ई-मेल, टपाल, समाजमाध्यमावरील पोस्ट, झोपडपट्टी परिसरातील नागरिकांच्या मुलाखती आदी विविध माध्यमातून तब्बल २ हजार ७०० सूचना व हरकती महापालिकेला प्राप्त झाल्या. उच्चभ्रू तसेच, झोपडपट्टी, चाळीत राहणारे रहिवासी, दुकानदार, स्वच्छता कर्मचारी, स्वयंसेवी संथ, पर्यावरणप्रेमी आदींनी कचऱ्याबाबत अनेक सूचना पालिकेला केल्या. अनेकांनी कचरा वर्गीकरण प्रक्रियेला पाठिंबा देत नागरिकांना त्याबाबत येणाऱ्या अडचणी अधोरेखित केल्या. कचरा कुंड्यांची कमतरता, कचऱ्याची विल्हेवाट लावण्यातील दिरंगाई, रात्री सेवा बंद असणे याबाबत नाराजी व्यक्त केली. तसेच, अनेकांना उपविधीची संकल्पना स्पष्ट झाली नसल्याने त्यांनी विरोध केला.

# तंत्रज्ञानाच्या मदतीने चोर गजाआड

मुंबई, दि. ४ प्रतिनिधी

वेगवेगळ्या मार्गाचा अवलंब करीत चकमा देणाऱ्या चोराला अखेर तंत्रज्ञानाच्या साह्याने गजाआड करण्यात पोलिसांना यश आले. अंधेरी स्थानाकातील चेहरा ओळख प्रणाली असलेल्या कॅमेर्यात तो कैद झाला, नंतर ई वाहन पोर्टलद्वारे माहिती मिळवून पोलिसांनी त्याला गजाआड केले.

मालाडच्या रत्नकला सराफ दुकानात २८ एप्रिल रोजी चोरी झाली होती. एका अज्ञात चोराने वातानुकूलीत यंत्रणेच्या (एसी) खिडकीतून दुकानात प्रवेश केला आणि दुकानातील सुमारे ५ लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने लंपास केले. या प्रकरणी मालाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलिसांनी घटनास्थळावरील सीसी टीव्ही कॅमेऱ्यांतील चित्रण तपासले. मात्र रात्रीची वेळ असल्याने आरोपीचा चेहरा स्पष्टपणे दिसत नव्हता. त्यामुळे पोलिसांनी त्याचा मागोवा घेण्यासाठी परिसरातील सीसी टीव्ही कॅमेऱ्यांतील चित्रण तपासले. चोरी केल्यानंतर चोराने मालाड – अंधेरीदरम्यान लोकलमधून प्रवास केला. तेथून तो मेट्रोने असल्फा व्हिलेजला गेला. पुढे बस आणि मग रिक्षाने तो पसार झाला होता. तो याच मार्गाने आल्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी पुन्हा सीसी टीव्ही कॅमेऱ्यांतील चित्रण तपासले. मात्र पोलिसांना गुंगारा देण्यासाठी आरोपी सतत कपडे बदलत असल्याचे लक्षात आले. सतत कपडे बदलणाऱ्या चोराच्या पायातील चप्पल मात्र एकच असल्याचे पोलिसांनी हेरले. हा तोच आरोपी असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले.

अंधेरी स्थानकात चेहरा ओळख प्रणालीचा कॅमेरा (फेस रेक्गनेशन सिस्टिम – एफआरएस) बसविण्यात आला होता. अभिलेखावरील गुन्हेगार या प्रणालीद्वारे ओळखता येतो. स्थानकातून जात असलेल्या आरोपीचा चेहरा या प्रणालीत कैद झाला. त्याचे छायाचित्र सर्व पोलीस ठाण्यात पाठविण्यात आले. हा आरोपी वर्सोवा पोलीस ठाण्याच्या अभिलेखावरील गुन्हेगार असल्याचे आढळून आले. एका घरफोडी प्रकरणात त्याच्याविरोधात गुन्हा दाखल होता. त्यावरून त्याची ओळख पटली. आरोपीचे नाव मुकीन खान (३०) असून तो घाटकोपर येथे वास्तव्यास असून तो फॅब्रिकेटरचे काम करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

आरोपीची ओळख पटली आणि त्याचा मोबाइल क्रमांक पोलिसांना मिळाला. मात्र मुकीन खान हा मोबाइल वापरत नव्हता. पोलीस त्याच्या उत्तर प्रदेशीतल सिध्दार्थ नगर जिल्ह्यातील पवनीनगर गावातही जाऊन आले. त्यानंतर पोलिसांनी त्याचा मोबाइल क्रमांक ई परिवहन पोर्टलवर टाकून पाहिला. त्या क्रमांकावर एक मोटारसायकल नोंदणीकृत असल्याचे समजले. त्यानुसार पोलिसांनी माहिती मिळवून मुकीन खानच्या मुसक्या आवळल्या

# प्रभादेवी पुलातील बाधित दोन्ही इमारती अतिधोकादायक

## म्हाडाच्या दुरुस्ती मंडळाने बजावली '७९ अ' नोटीस


मुंबई, दि. ४ प्रतिनिधी

प्रभादेवी पुलाचे पाडकाम आणि पुनर्बांधणीत बाधित होणाऱ्या प्रभादेवी पुलालगतच्या हाजी नुरानी आणि लक्ष्मी या दोन इमारतींच्या पुनर्वसनाचा प्रश्न गंभीर बनलेला असतानाच आता या दोन्ही इमारती म्हाडाच्या अतिधोकादायक इमारतींच्या यादी समाविष्ट झाल्या आहेत. या दोन्ही इमारतींना म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाने '७९ अ'अंतर्गत पुनर्विकास प्रक्रिया सुरू करण्यासंबंधी नोटीस बजावली आहे. लवकरच घरे रिकामी करण्याची नोटीसही बजावण्यात येणार आहे. त्यामुळे आता या दोन्ही इमारतींमधील रहिवाशांच्या संकटात वाढ झाली आहे.

अटल सेतूला जोडणाऱ्या वरळी – शिवडी उन्नत रस्ता प्रकल्पाअंतर्गत प्रभादेवी पूल पाडून त्याजागी नवीन डबलडेकर पूल बांधण्यात येणार आहे. या पुलाच्या कामात हाजी नुरानी आणि लक्ष्मी या दोन इमारती बाधित होत असून इतर १७ इमारतींना धक्का पोहचण्याची भिती आहे. त्यामुळे १९ इमारतींमधील रहिवाशांनी पुलाच्या पाडकामाला विरोध करून पुलाचे पाडकाम रोखून धरले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने १९ इमारतींचा समुह पुनर्विकास करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र यासंबंधीचा कोणताही शासन निर्णय अद्याप जारी झालेला नाही वा यासंबंधीचे कोणतेही लेखी आश्वासन सरकारकडून देण्यात आलेले नाही. त्यामुळे रहिवासी संभ्रमात असून त्यांनी लेखी आश्वासन मिळाल्याशिवाय प्रभादेवी पूल पाडू न देण्याची ठाम भूमिका घेतली आहे. परिणामी, पुलाचे पाडकाम, पुनर्बांधणी रखडली आहे. आता या दोन इमारती म्हाडाच्या दुरुस्ती मंडळाच्या पावसाळापूर्व सर्वेक्षणात अतिधोकादायक यादीत समाविष्ट झाल्या आहेत. त्यामुळे नियमानुसार या दोन्ही इमारतींना दुरुस्ती मंडळाने '७९ अ'ची नोटीस बजावली असून पुनर्विकासाची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या नोटीशीनुसार इमारतींच्या मालकाला पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. सहा महिन्यांत मालकाकडून प्रस्ताव सादर न झाल्यास सोसायटीला पुनर्विकास प्रस्ताव सादर करण्याची संधी दिली जाणार आहे. या पुढील सहा महिन्यात सोसायटीचा प्रस्ताव न आल्यास म्हाडाकडून भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करून म्हाडाच्या माध्यमातून पुनर्विकास मार्गी लावला जाणार आहे.

# युवा नृत्य दिग्दर्शक ओंकार मुळाजकरांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

मुंबई, दि. ४ प्रतिनिधी



मुंबईकर युवा नृत्य दिग्दर्शकाचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाल्याची दुःखद बातमी समोर आली आहे. ओंकार मुळाजकर असे मयत तरुणाचे नाव आहे. ऐन तारुण्यात ओंकारला मृत्यूने गाठल्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. ओंकारच्या अकस्मात निधनामुळे मुळाजकर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून मित्र परिवारालाही मोठा धक्का बसला आहे. ओंकारने मृत्यूच्या काही तास आधीच सोशल मीडियावर स्टोरीही शेअर केली होती.

प्रख्यात लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेते चंद्रशेखर सांडवे यांनी फेसबुकवर पोस्ट लिहित ओंकार मुळाजकर याच्या मृत्यूची बातमी दिली आहे. चंद्रशेखर सांडवे हे सांस्कृतिक कलादर्पणचे सर्वेसर्वा म्हणून ओळखले जातात. गेल्या काही दिवसात युवा कलाकारांची हार्ट अटॅकने होणारी अखेर चिंतेचा विषय ठरत आहे.

ओंकार मुळाजकर हा युवा नृत्य दिग्दर्शक म्हणून मनोरंजन विश्वात लोकप्रिय होता. सांस्कृतिक कलादर्पण पुरस्कार सोहळ्यासाठी तो गेली अनेक वर्ष सहाय्यक नृत्य दिग्दर्शक म्हणून काम करत होता. ओमी म्हणून तो मराठी इंडस्ट्री आणि मित्रांमध्ये प्रसिद्ध होता.

"सांस्कृतिक कलादर्पणच्या पुरस्कार सोहळ्यासाठी गेली अनेक वर्षे सहाय्यक नृत्य दिग्दर्शक म्हणून काम करणारा कै. नृत्य दिग्दर्शक ओंकार मुळाजकर (ओमी) याचे आत्ताच हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले. ईश्वर त्याच्या पवित्र आत्म्याला चिरशांती देवो. भावपूर्ण श्रद्धांजली" अशा भावना चंद्रशेखर सांडवे यांनी फेसबुक पोस्टच्या माध्यमातून व्यक्त केल्या आहेत.

धक्कादायक म्हणजे मृत्यूच्या काही तास आधीच त्याने इन्स्टाग्रामवर एक स्टोरीही शेअर केली होती. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त कल्याण येथे आयोजित कार्यक्रमाचे वृत्त देणाऱ्या वर्तमानपत्रांचे फोटो त्याने स्टोरीमध्ये शेअर केले होते.

# आदित्य ठाकरेंची मनसेला टाळी

मुंबई, दि. ४ प्रतिनिधी

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मनसे व शिवसेना (ठाकरे) हे पक्ष एकत्र येण्याबाबत सूचक वक्तव्य केलं होतं. त्यानंतर या दोन पक्षांच्या युतीची चर्चा सुरू झाली होती. पाठोपाठ शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे देखील मागे हटले नाहीत. त्यांनी देखील राज ठाकरे यांना प्रतिसाद दिला होता. आता उद्धव ठाकरे यांचे पुत्र आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी देखील मनसेला टाळी दिली आहे. "महाराष्ट्र हितासाठी आपण कोणत्याही पक्षाबरोबर एकत्र यायला तयार आहोत, म्हणूनच आम्ही मनसेला साद दिली आहे", असं आदित्य ठाकरे यांनी म्हटलं आहे.

आदित्य ठाकरे यांच्याबरोबरच शिवसेना (ठाकरे) खासदार संजय राऊत, आमदार अनिल परब, आमदार अंबादास दानवे, आमदार सुनील प्रभू यांनी देखील वारंवार युतीबाबत अनुकूलता दर्शवली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची दुसरी फळी मात्र युतीबाबत अनुकूल नसल्याचं दिसतंय.

दरम्यान, स्वतः आदित्य ठाकरे यांनी युतीबाबत केलेल्या वक्तव्यास त्यांचे काका राज ठाकरे प्रतिसाद देणार का? असा प्रश्न सर्वांना पडला आहे. आदित्य ठाकरे म्हणाले की "आम्ही आमच्याकडून प्रतिसाद



दिला आहे. आमची भावना व्यक्त केली आहे. मराठी माणूस व महाराष्ट्राच्या हितासाठी जो कोणी आमच्या बरोबर यायला तयार असेल आम्ही त्यांना बरोबर घेऊन महाराष्ट्र हितासाठी लढत राहू. काल परवा आमचे नेते दीपेश म्हात्रे व मनसेचे नेते राजू पाटील यांनी एकत्र येऊन आंदोलन केलं. हे त्याचंच उदाहरण आहे. लोकांच्या मनात काय आहे हे आम्हाला माहिती आहे आणि आमचं मन देखील साफ आहे. जो कोणी नेता महाराष्ट्र हितासाठी आमच्याबरोबर यायला तयार असेल, जो पक्ष पुढे येत असेल, आम्ही त्यांच्याबरोबर एकत्र येऊन लढू".

शिवसेनेचे (ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी देखील यावर भाष्य केलं आहे. ते म्हणाले, "युतीच्या चर्चेवर कोणीही मौन बाळगलेलं नाही. स्वतः मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी त्यांच्या मनातली इच्छा व्यक्त केली आहे, त्यांच्या सहकाऱ्यांनी नव्हे. राज ठाकरे यांच्या इच्छेवर त्यांचे बंधू उद्धव ठाकरे यांनी देखील अनुकूल भूमिका घेतली आहे. त्यानंतर आम्ही सर्वांनी देखील योग्य भूमिका घेतल्या आहेत. त्यामुळे तुमच्या सर्वांच्या मनातली बातमी तुम्हाला लवकरच कळेल".

# नाले सफाई करताना कामगाराच्या मृत्यूला खुले आमंत्रण

मुंबई, दि. ४ प्रतिनिधी

नालेसफाई होत असताना कामगारांच्या सुरक्षा विषयी कंत्राटदार मनमानी कारभार करत असल्याने, कामगारांचा मृत्यू होऊ शकतो. अनेक कामगार असेच मृत्यू झाल्याच्या घटना यापूर्वी घडल्या आहेत. त्यामुळे सरकारने व पालिकेने या प्रकरणी कारवाई करावी. अशी मागणी पुढे येत आहे.

घाटकोपर पश्चिम, गंगावाडी परिसरात सध्या सुरू असलेल्या नाले सफाई कामांदरम्यान जे.सी.बी. यंत्राच्या फाळक्यावर कामगार उभा असल्याचे धक्कादायक दृश्य समोर आले आहे. या प्रकाराचे फोटो समाजमाध्यमांवर व्हायरल होत असून, कामगार सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. याबाबत राष्ट्रवादी युवक काँग्रेस मुंबई अध्यक्ष ॲड अमोल मातेले यांनी पालिकेला पत्र पाठवत कंत्राटदाराच्या मनमानी कारभाराची चौकशी केली आहे.

"ही नाले सफाई नाही, तर कामगारांच्या मृत्यूला खुले आमंत्रण आहे! जे.सी.बी.सारख्या धोकादायक यंत्रावर माणूस उभा असणे ही केवळ निष्काळजीपणा नव्हे, तर अमानुषतेची परिसीमा आहे."

महानगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे आणि कंत्राटदारांच्या बेजबाबदार पद्धतीमुळे कामगारांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला आहे. कामगारांच्या सुरक्षिततेसाठी कोणती उपाययोजना केली जात आहे? कोणती सुरक्षा साधने कामगारांना उपलब्ध करून दिली गेली आहेत? असा सवाल राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने केला असून तीव्र निषेध व्यक्त केला आहे.

संबंधित अधिकाऱ्यांवर आणि कंत्राटदारावर तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी.भविष्यात असे प्रकार घडू नयेत म्हणून कडक उपाययोजना करण्यात याव्यात.यापुढे अशा घटनांमुळे कुणाचा जीव गेल्यास, त्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी महानगरपालिका व कंत्राटदाराची असेल. कामगार हे आपल्या शहराच्या विकासाचा पाया आहेत. त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी समाज आणि प्रशासनाने तितक्याच गांभीर्याने घेतली पाहिजे.

# महिलांची विक्री करणारे रॅकेट उध्वस्त

भाईंदर, दि. ४ प्रतिनिधी

वेश्याव्यवसासाठी पिडीत महिलांची विक्री करणाऱ्या रॅकेटवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष भाईंदरच्या पथकाने कारवाई केली आहे. यावेळी तीन दलालांविरोधात कारवाई करण्यात आली असून त्यांच्या तावडीतून तीन पिडीत महिलांची सुटका करण्यात आली आहे. मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील फाऊंटन हॉटेल परिसरात वेश्याव्यवसासाठी महिलांची विक्री केली जात असल्याची माहिती मिळाल्यावरून अनैतिक वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या भाईंदर शाखेने सापळा रचला होता. यावेळी अनिकेत संतोष चव्हाण, नेहा आणि दिव्या उर्फ संगीता या दलालांना पोलीस पथकाने अटक केली. याकारवाईत पोलिसांनी तीन पिडीत महिलांची याटोळक्याच्या तावडीतून मुक्तता केली. याप्रकरणी काशिगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कापणी झालेल्या पिकांना नुकसानभरपाई

**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

राज्यातील विविध भागात नुकत्याच झालेल्या पावसामुळे कापणी केलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अशा प्रकारे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत विचार केला जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत राज्यात पावसामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी विविध मंत्र्यांनी कापणी केलेल्या पिकाच्या नुकसानीचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर फडणवीस यांनी कापणी झालेल्या पिकाची नुकसानभरपाई विचाराधीन असल्याचे सांगितले.

वन मंत्री गणेश नाईक आणि बंदरे विकास मंत्री नीलेश राणे यांनी पावसामुळे सुकी मासळीचे नुकसान झाले आहे. त्यांनी मच्छिमारांना नुकसानभरपाई देण्याची मागणी केली. यावर मुख्यमंत्र्यांनी मदत आणि पुनर्वसन विभागाला यावर प्रस्ताव सादर करण्याची सूचना केली. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी पावसामुळे रस्ते आणि छोट्या पुलांचे नुकसान झाले आहे. त्यांची दुरुस्ती केली जावी, अशी मागणी केली. ग्रामविकास विभागाकडून ग्रामीण भागातील रस्ते दुरुस्ती करण्यासाठी सूचना द्याव्यात, अशी मागणी पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी केली. यावर गेल्या १५ दिवसांत ज्या भागात रेड अलर्ट घोषित केला होता तेथील रस्ते आणि पूल दुरुस्ती बाबत विचार केला जावा, असे निर्देश फडणवीस यांनी दिले.

या बैठकीत मदत आणि पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी यांनी सादरीकरणाद्वारे राज्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा आणि मदतीची माहिती दिली. राज्य मंत्रिमंडळाच्या २७ मे रोजी झालेल्या बैठकीत घरांच्या पडझडींच्या दुरुस्ती आणि पुनर्बांधणीसाठी तातडीने मदतीकरीता निधी द्यावा, अशा सूचना केल्या होत्या. त्यानुसार ४९ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. कोकण विभागास पाच कोटी, पुणे विभागास १२ कोटी, नाशिक विभागास पाच कोटी, छत्रपती संभाजीनगर विभागास १२ कोटी, अमरावती विभागास पाच कोटी आणि नागपूर विभागास दहा कोटी असे एकूण ४९ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत, अशी माहिती सेठी यांनी दिली.

त्याचबरोबर खरीप २०२५ आणि यापुढील कालावधीसाठी केंद्र सरकार अथवा राज्य सरकारने अधिसूचित केलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेती पिकांच्या नुकसानीपोटी द्यावयाची भरपाई दर आणि निकष २७ मार्च २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार देय राहतील. यामुळे १ जानेवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिलेल्या सूचना रद्द करण्यात आल्या आहेत, असे सोनिया सेठी यांनी सांगितले.

दरम्यान, बैठकीत जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी उजनी धरणाच्या जलाशयात १४.५ टीएमसी, जायकवाडी धरणात २८ टीएमसी तर गोसीखुर्द धरणात ३.७२ टीएमसी पाणीसाठा असल्याची माहिती दिली. तर राज्यातील पाणी टंचाईच्या परिस्थितीमध्ये सुधारणा झाली आहे. गेल्या आठवड्याच्या तुलनेत टँकरने पाणी पुरवठा करण्याच्या गावांच्या संख्येत २०० ने तर टँकरच्या संख्येत ३३६ ने घट झाली आहे. छत्रपती संभाजीनगर आणि जालना या दोन जिल्ह्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरू असल्याची माहिती पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे यांनी दिली.

# एसटी कर्मचाऱ्यांना जूनपासून वाढीव महागाई भत्ता

## 1 कोटींचा अपघाती विमा, सेवानिवृत्तांना वर्षभर मोफत प्रवास

**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

राज्यातील एसटी महामंडळातील लाखो कर्मचाऱ्यांसाठी दिलासादायक घोषणा करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज महत्त्वपूर्ण निर्णयांची जाहीरात केली. येत्या जून २०२५ पासून कर्मचाऱ्यांना मूळ वेतनावर ५३ टक्के महागाई भत्ता देण्यात येणार आहे, असे शिंदे यांनी स्पष्ट केले. यासोबतच १ कोटी रुपयांचे अपघाती विमा कवच, तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना संपूर्ण वर्षासाठी मोफत प्रवास पास देण्याचेही आश्वासन त्यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृहात आयोजित एसटी महामंडळाच्या विविध संघटनांच्या प्रतिनिधींशी झालेल्या बैठकीत उपमुख्यमंत्र्यांनी ही घोषणा केली. बैठकीस परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आमदार सदाभाऊ खोत, माजी खासदार आनंदराव अडसूळ, तसेच वरिष्ठ अधिकारी व संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, "एसटी ही सामान्य जनतेची जीवनवाहिनी आहे. त्यामुळे तिची सेवा दर्जेदार, स्वच्छ आणि सुलभ असली पाहिजे. फक्त बसच नव्हे तर बसस्थानकांनाही 'बस पोर्ट'च्या दर्जापर्यंत नेण्यासाठी प्रयत्न करावेत." त्यांनी कार्गो सेवा सुरू करण्यावरही भर देत एसटीच्या तोट्यातून बाहेर येण्यासाठी सर्वतोपरी उपाय योजण्याचे निर्देश दिले.

### वैद्यकीय सुविधा आणि विमा योजना

कर्मचाऱ्यांसाठी 'महात्मा फुले जनआरोग्य योजना' किंवा 'धर्मवीर आनंद दिघे वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना' यापैकी एक निवडण्याचा पर्याय देण्यात आला आहे. यामध्ये ५ लाखांपर्यंत कॅशलेस वैद्यकीय सुविधा उपलब्ध असेल.

याशिवाय स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेत वेतन खाते असलेल्या कर्मचाऱ्यांना १ कोटी रुपयांपर्यंतचा अपघाती विमा कवच देण्यात येणार आहे. पूर्णतः अपंगत्वासाठी १ कोटी, अंशतः अपंगत्वासाठी ८० लाख रुपयांपर्यंत विमा रक्कम देण्यात येईल.

### सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी खास सुविधा

सुमारे ३५,००० सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या पत्नीला आता वर्षभरासाठी मोफत प्रवास पास मिळणार आहे. यापूर्वी हा पास केवळ ९ महिन्यांसाठी होता, तो आता १२ महिन्यांसाठी वाढवण्यात आला आहे.

### थकबाकीबाबत लवकर निर्णय

महागाई भत्त्याच्या थकबाकीबाबतही चर्चा झाली असून, उपमुख्यमंत्री शिंदे यांनी "निधीची उपलब्धता पाहून यावर सकारात्मक निर्णय घेतला जाईल," असे आश्वासन दिले.

या निर्णयामुळे राज्यातील एसटी महामंडळातील हजारो कर्मचाऱ्यांना दिलासा मिळणार असून, त्यांच्या हिताच्या दृष्टीने सरकार ठोस पावले उचलत असल्याचे आजच्या घोषणांवरून स्पष्ट झाले आहे.

# छत्रपती संभाजीनगरात १५ एकरावर ईएसआयसी रुग्णालय

## आणखी ९ ठिकाणी प्रस्तावित केंद्रांना मंजुरी

**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

राज्यातील कामगारवर्गासाठी एक दिलासादायक पाऊल उचलताना, राज्य मंत्रिमंडळाने छत्रपती संभाजीनगरात कर्मचारी राज्य विमा निगमचे (ESIC) २०० खाटांचे रुग्णालय उभारण्यासाठी १५ एकर गायरान जमीन देण्यास मंजुरी दिली आहे. तसेच, महाराष्ट्रातील इतर नऊ महत्त्वाच्या ठिकाणी प्रस्तावित ESIC रुग्णालयांसाठीही शासकीय जमिनी देण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली आहे.

उद्योगवाढीचा वेग पाहता छत्रपती संभाजीनगरात वैद्यकीय सुविधा वाढवणे गरजेचे झाले होते. शहरातील मौजे करोडी येथे हे आधुनिक रुग्णालय उभारले जाणार असून, शेंद्रा, बिडकीन, डिएमआयसी, वाळूज, चिकलठाणा आणि रेल्वे स्टेशन परिसरातील झपाट्याने वाढणाऱ्या कामगार वर्गाला दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी, यासाठी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

### राज्यात इतर ठिकाणीही ESIC रुग्णालयांचा विस्तार

कामगार कल्याणाच्या दृष्टीने महाराष्ट्र सरकारने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. बिबवेवाडी (पुणे), अहिल्यानगर, सांगली, अमरावती, बल्लारपूर (चंद्रपूर), सिन्नर (नाशिक), बारामती (पुणे), सातारा आणि पनवेल (रायगड) या ठिकाणी प्रस्तावित ESIC रुग्णालयांसाठीही शासकीय जमीन उपलब्ध करून देण्यास मंत्रिमंडळाने तत्वतः मंजुरी दिली आहे. ही सर्व केंद्रे राज्यातील महत्त्वाच्या औद्योगिक आणि नागरी भागांत असून, या भागांतील मोठ्या संख्येने कार्यरत असलेल्या कामगारवर्गाच्या आरोग्य गरजांची पूर्तता करण्यासाठी ही रुग्णालये आवश्यक आहेत.

ईएसआयसी रुग्णालयांची ही साखळी उभारल्याने कामगारवर्गाला सुलभ, दर्जेदार आणि किफायतशीर आरोग्य सेवा मिळेल, असा सरकारचा विश्वास आहे. या निर्णयामुळे कामगारवर्गाच्या आरोग्य सुरक्षेत मोठी वाढ होणार असून, औद्योगिक क्षेत्राच्या सामाजिक जबाबदारीचाही हा एक सकारात्मक टप्पा ठरणार आहे.

राज्य सरकारच्या या निर्णयाचे श्रेय कामगार कल्याणाच्या दिशेने उचललेल्या पुढाकाराला जात असून, राज्यभरातील कामगारांना याचा थेट लाभ मिळणार आहे.

# राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना

## राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आणि जमाती आयोगाचे विभाजन करून अनुसूचित जमातीसाठी स्वतंत्र आयोग स्थापन करण्याचा निर्णय मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या आयोगासाठी पदनिर्मिती, जागा आणि अनुषंगिक खर्चास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

केंद्रीय स्तरावर देशात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यासाठी दोन स्वतंत्र आयोग आहेत. या दोन्ही आयोगांशी निगडीत विषय वेगेवगळे आहेत. त्यामुळे दोन स्वतंत्र आयोग असणे आवश्यक आहे. तसेच ५१ व्या जनजाती सल्लागार परिषदेत महाराष्ट्र राज्यात स्वतंत्र अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यानुसार हा आयोग स्थापन करण्याचा निर्णय झाला आहे.

या आयोगाची रचना राज्य अनुसूचित जाती आयोगप्रमाणेच एक अध्यक्ष आणि चार अशासकीय सदस्य अशी राहील. आयोगासाठी नव्याने २६ पदे निर्माण करण्यात येणार आहेत. या पदांसाठीचे तसेच आयोगाचे सदस्य यांचे वेतन, भत्ते आणि कार्यालयासाठी भाडे तत्वावर जागा, फर्निचर, वीज, दूरध्वनी, इंधन यांसह अनुषंगिक खर्चासाठी ४ कोटी २० लाख रुपयांच्या तरतुदीस मंत्रिमंडळाने मान्यता दिली. दरम्यान, अनुसूचित जाती आयोग देखील स्वतंत्रपणे कार्यरत राहणार आहे. या दोन्ही आयोगांना वैधानिक दर्जा मिळावा यासाठी मंत्रिमंडळाने तत्वतः मान्यता असून त्यासाठी आगामी काळात कार्यवाही करण्यात येणार आहे.

### कामगार विमा रुग्णालयासाठी सिन्नरला जमीन

प्रस्तावित राज्य कामगार विमा रुग्णालयासाठी नाशिक जिल्ह्यातील सिन्नरसह बिबवेवाडी (पुणे), अहिल्यानगर, सांगली, अमरावती, बल्लारपूर (चंद्रपूर), बारामती(पुणे), सातारा आणि पनवेल (रायगड) येथील शासकीय जमीन उपलब्ध करून देण्यास आज मंत्रिमंडळ बैठकीत तत्वतः मान्यता देण्यात आली. तसेच छत्रपती संभाजीनगर येथे राज्य कामगार विमा योजनेच्या रूग्णालयासाठी १५ एकर जमीन देण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळाने घेतला.

# हिंदमाता, गांधी मार्केट येथील उदंचन केंद्र अधिक परिणामकारकरित्या कार्यरत ठेवावेत- भूषण गगराणी

**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

सखल भागातील पावसाळी पाणी उपसणारी यंत्रणा अधिक प्रभावी असावी. हिंदमाता, गांधी मार्केट येथील उदंचन केंद्रांची क्षमता अधिक परिणामकारक पद्धतीने कार्यरत ठेवावी. उदंचन केंद्राचे परिचलन अधिक सक्षम व्हावे, यासाठी काळजी घ्यावी. चुनाभट्टी रेल्वे स्थानक परिसरात पाणी साचू नये आणि हार्बर मार्गावरील उपनगरीय रेल्वे सेवा विस्कळीत होऊ नये, याची दक्षता बाळगावी, असे निर्देश महानगरपालिका आयुक्त श्री. भूषण गगराणी यांनी दिले. रस्ते काँक्रिटीकरणाची कामे पूर्ण झाल्यावर रस्तारोधक (बॅरिकेड्स) काढले आहेत का, उर्वरित बांधकाम साहित्य तसेच राडारोड्याची विल्हेवाट लावली आहे का, पदपथ सुस्थितीत आहेत का याची अधिकाऱ्यांनी पाहणी करुन खातरजमा करावी असे निर्देश देखील श्री. गगराणी यांनी दिले.

पावसाळापूर्व कामांचा भाग म्हणून महानगरपालिकेच्या पर्जन्य जलवाहिन्या विभाग आणि रस्ते व वाहतूक विभागामार्फत मुंबई महानगरात विविध कामे सुरू आहेत. या अनुषंगाने, जोरदार पावसावेळी शहर विभागातील हिंदमाता, गांधी मार्केट आणि पूर्व उपनगरांतील चुनाभट्टी रेल्वे स्थानकाजवळील पाणी साचण्याच्या संभाव्य ठिकाणांची तसेच रस्ते काँक्रिटीकरण कामांची महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी यांनी



आज (दिनांक ३ जून २०२५) पाहणी केली. तसेच, अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजनांची सविस्तर माहिती घेऊन आवश्यक ते निर्देश दिले.

भूषण गगराणी यांनी दादर येथील हिंदमाता आणि शीव (सायन) येथील गांधी मार्केट येथील जल साठवण टाकी, उपसा संच, मुख्य जलवाहिनी आणि साठवण प्रक्रियेचा आढावा घेतला. श्री. गगराणी म्हणाले की, हिंदमाता आणि गांधी मार्केट उदंचन केंद्राचे परिचलन अधिक परिणामकारक व्हावे, यासाठी अधिक दक्ष रहावे. या ठिकाणी 'फ्लो मीटर' बसवावेत. सर्व पंपांची क्षमता एकसमान करावी. आपत्कालीन समयी अतिरिक्त मनुष्यबळ नेमावे, उदंचन संच बंद पडल्यास पर्यायी व्यवस्था म्हणून डिझेल जनित्र (जनरेटर) संच तातडीने उपलब्ध करून द्यावेत. पावसाच्यावेळी उदंचन केंद्र यंत्रणा पुरेशा क्षमतेने आणि वेळेत कार्यान्वित करावे. उदंचन केंद्र परिचालकांनी महानगरपालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन विभागशी संपर्क साधून पावसाचा नियमितपण अंदाज घ्यावा. अधिकाऱ्यांनी यंत्रणेला वेळोवेळी सतर्क करावे. चुनाभट्टी रेल्वे स्थनकाजवळील नाल्यांची व्यवस्थित स्वच्छता करावी. उदंचन संच बंद पडला तर पर्याय म्हणून दुसरा संच तातडीने तैनात ठेवावा. तातडीच्या प्रसंगी या पर्यायी व्यवस्थेचा प्रतिसाद कालावधी जलद असावा, असे निर्देश गगराणी यांनी दिले.

## धारावी पुनर्विकास प्रकल्प

# अपात्र नागरिकांच्याही पुनर्वसनाचा मार्ग मोकळा

**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी दुग्ध व्यवसाय विकास विभागाची कुर्ला येथील ८.५ हेक्टर जमीन हस्तांतरित करण्यासाठी करारनाम्यातील अटी, शर्तीमध्ये सुधारणांना मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. धारावीचा पुनर्विकास करताना प्रत्येक पात्र स्थानिकाला तिथेच घर हे सरकारचे आश्वासन आहे. आताच्या या निर्णयामुळे धारावीतील अपात्र नागरिकांच्याही पुनर्वसनाचा मार्ग मोकळा झाला आहे. धारावीचा पुनर्विकास करताना कोणावरही अन्याय होउ देणार नाही असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे.



दुग्ध व्यवसाय विकास विभागाच्या कुर्ला येथील मातृदुग्धशाळेची जमीन धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी १४ जून २०२४ च्या निर्णयानुसार प्रदान करण्यात आली आहे. या प्रकल्पाचे नियोजन प्राधिकरण म्हणून ही जमीन काही अटी व शर्तींवर धारावी पुनर्विकास प्रकल्प- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना प्रदान करण्यात आली आहे. हा प्रकल्प राबविणे अधिक सुलभ व्हावे यासाठी या ज्ञापनातील आणि जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या मसुदा करारनाम्यातील अटी व शर्ती गृहनिर्माण आणि नगरविकास विभागाच्या धोरणाशी सुसंगत करण्यास मान्यता देण्यात आली.

या निर्णयामुळे धारावीतील रहिवाश्यांच्या पुनर्वसनासाठी जास्तीत जास्त घरे उपलब्ध होऊ शकणार आहेत. धारावी पुनर्विकासात साडे आठ लाख कुटुंबांचे पुनर्वसन करावे लागणार आहे. यापैकी पाच लाख पात्र कुटुंबाचे पुनवर्सन धारावी परिसरात पुनर्वसन होणार आहे. उर्वरित साडे तीन लाख कुटुंबांचे पुनवर्सन करण्यासाठी अधिकची जमीन गरजेचे आहे. कुर्ला येथील जमीन उपलब्ध झाल्याने आणखी काही कुटुंबांचे पुनर्वसन करणे सुलभ होणार आहे. या निर्णयामुळे धारावीतील अपात्र नागरिकांच्या पुनर्वसनाचा मार्ग मोकळा होणार आहे. सर्वांसाठी घरे या धोरणाचे पालन करताना हा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण असून, केवळ घरेच नाही, तर शाळा, रुग्णालये, शॉपिंग कॉम्प्लेक्स अशा इतरही नागरी सुविधांचे निर्माण सुलभ होणार आहे.

# मुंबई प्रवेश टोलमाफी आता 2029 पर्यंत वाढविली

**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

मुंबई, मुंबई शहरात प्रवेश करण्याच्या पाच टोल नाक्यांवर हलकी वाहने, शालेय बसेस व राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस यांना पथकरातून सवलत देण्यात आली आहे. या पथकराच्या सवलतीपोटी महामंडळास भरपाई देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. तसेच या टोल सवलतीचा कालावधी १७ सप्टेंबर २०२९ पर्यंत वाढविण्यासही बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्य रस्ते विकास महामंडळाच्या मुंबई प्रवेश द्वाराच्या सायन – पनवेल मार्गावर वाशी येथे, लाल बहादूर शास्त्री रस्त्यावर मुलुंड येथे, पूर्व द्रुतगती मार्गावर मुलुंड येथे, ऐरोली पुलाजवळ, तसेच पश्चिम द्रुतगती मार्गावर दहीसर येथील नाक्यांवर १४ ऑक्टोबर २०२४ पासून पथकरातून सवलत देण्यात आली आहे. ही सवलत दिल्यामुळे एम.ई.पी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांना या प्रकल्पासाठी करारनाम्यानुसार नुकसान भरपाई देण्याकरिता मुख्य सचिव यांच्या समितीने शिफारस केली आहे.

### टोल वसुलीचा कालावधी वाढविला

तसेच वसुलीचा मुळ कालावधी १९ ऑक्टोबर २०१० ते १८ नोव्हेंबर २०२६



होता. या कालावधीत सुधारणा करून तो १७ सप्टेंबर २०२९ पर्यंत वाढविण्यास मान्यता देण्यात आली. तथापि या १९ नोव्हेंबर २०२६ ते १७ सप्टेंबर २०२९ या कालावधीतील सर्व प्रकारच्या वाहनांची प्रत्यक्ष गणनेचा रिअल-टाईम-डाटा उपलब्ध करून देण्याची अनिवार्य अट घालण्यात आली आहे. तसेच मुंबई व उपनगर विभागातील २७ उड्डाणपुले व अनुषंगिक बांधकामांची निगा व देखभाल-दुरूस्तीची जबाबदारी ही संबंधित कंपनीकडेच राहणार आहे. याशिवाय, वाशी खाडी पूल या प्रकल्पासाठी पथकर सवलत नुकसान भरपाई पोटी खाडी पूल क्रमांक ३ च्या प्रकल्पाची सुमारे ७७५ कोटी ५८ लाख रुपयांची किंमत महामंडळास भरपाई ऐवजी टप्प्या-टप्प्याने रोख स्वरुपात देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

## महत्त्वाच्या बातम्या

### मंदिरात चोरी करणाऱ्यांना बेड्या

**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

दक्षिण मुंबईतील एका मंदिरातील मुकुट आणि दानपेटी चोरी करून पसार होत असलेल्या दोन लुटारूंना वडाळा पोलिसांनी मंगळवारी पहाटे नाकाबंदीत बेड्या ठोकल्या. वडाळा पोलिसांनी पूर्व मुक्त मार्गावरील उड्डाणपुलाच्या खाली गोदरेज जंक्शनवर ही कारवाई केली. यात पोलिसांनी ५० ते ६० ग्रॅम वजनाचा चांदीचा मुकुट आणि एक दानपेटी जप्त केली आहे. नाकाबंदीदरम्यान बीट मार्शल पोलीस हवालदार सागर पवार यांनी संशयास्पद टॅक्सी थांबवून तिची तपासणी केली. टॅक्सीमध्ये बसलेल्या रफीउल्ला एहसान उल्ला खान (२६) आणि राजू कांबळे (२१) या दोन संशयितांकडे एक स्टीलची दानपेटी आणि ५० ते ६० ग्रॅम वजानाचा लाल रंगाचा मणी असलेला मुकुट सापडला. पोलिसांनी खान आणि कांबळे यांच्याकडे चौकशी केली असता ते घाबरले. त्यांनी दक्षिण मुंबईतील भुलाभाई देसाई रोडवरील शनिमंदिरामधून मुकुट आणि दानपेटी चोरी केल्याची कबुली पोलिसांना दिली. दोन्ही आरोपी हे ॲण्टॉप हिलमधील संगमनगर, चिखलवाडीतील रहिवासी आहेत. मंदिरात झालेल्या चोरीबाबत गावदेवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असल्याने आरोपींना पाठविण्यात आले.

### अभियंत्याने गमावले १४ लाख रुपये

**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

अंधेरी येथील एका अभियंत्याचा फोन हॅक न करता त्याच्या मोबाइलमध्ये प्रवेश मिळवत त्याच्या नावावर सुमारे १५ लाख रुपयांचे कर्ज घेतले. या नव्या कार्यपध्दतीने पोलीसही चक्रावले आहेत. तक्रारदार आयटी अभियंता म्हणून काम करतो. त्याला क्रेडीटो २४ नावाच्या कंपनीतून एक कॉल आला. त्याने या कंपनीतून १३ हजार ५०० रुपये कर्ज घेतले असून त्याचे हप्ते भरलेले नाहीत, असे या कंपनीने सांगितले. ते ऐकून अभियंत्याला धक्का बसला.

### वेशांतर करून चोऱ्या करणारा जेरबंद

**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

वेशांतर करून चोऱ्या करणाऱ्या चोराला मालाड पोलिसांनी अटक केली. रंजीतकुमार सिंह ऊर्फ मुन्ना (४४) अशी अटक आरोपीचे नाव आहे. अटक आरोपी चोरी केल्यानंतर पोलिसांना चकवा देण्यासाठी सतत वेशांतर करत होता. त्याने पश्चिम उपनगरात अनेक ठिकाणी चोरी केली होती, मात्र आजवर एकदाही तो पकडला गेला नव्हता. त्याने चोरीच्या रकमेतून गावात जमीन, तर मुंबईत घर विकत घेतले होते. यातील अटक आरोपी इमारतीच्या पाइपवर चढून खिडकीवाटे तो घरात प्रवेश करायचा आणि अवघ्या काही वेळेत घरातील मौल्यवान सामान चोरून पसार व्हायचा. चोरी करताना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद होऊ नये, यासाठी तो आपला चेहरा पूर्णपणे झाकून घेत होता. ओळखता येईल अशी एकही खूण तो मागे ठेवत नव्हता. मालाडमधील एका इमारतीच्या पहिल्या माळ्यावर चढून त्याने घरातील साडेचार लाख रुपयांचा ऐवज १७ मार्च रोजी चोरला होता.

### म्हाडातर्फे राज्यभरात दोन लाख झाडांचे रोपण

**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

जुलै महिन्यात देशात साजरा करण्यात येणाऱ्या वन महोत्सव सप्ताहानिमित्त महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणा (म्हाडा) तर्फे राज्यात सुमारे दोन लाख झाडांचे रोपण करण्यात येणार आहे. यापैकी सुमारे ५० हजार झाडे मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर) क्षेत्रात लावण्यात येणार असल्याची माहिती म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी सोमवारी म्हाडा मुख्यालयात आयोजित विभाग प्रमुखांच्या बैठकीत दिली. या बैठकीत बोलताना जयस्वाल यांनी सांगितले की, १ ते ७ जुलै दरम्यान म्हाडाच्या राज्यातील विविध मंडळांच्या अखत्यारित वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन मोठ्या प्रमाणात करण्यासाठी जयस्वाल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत की, मुंबई क्षेत्रातील अविकासयोग्य भूखंड जिथे बांधकाम किंवा कोणताही विकास करता येत नाही, अशा भूखंडांची ओळख पटवावी आणि त्या ठिकाणी मियावाकी पद्धतीने घनदाट शहरी जंगले निर्माण करण्याचे नियोजन करावे. म्हाडाची विभागीय मंडळे जसे मुंबई गृहनिर्माण मंडळ व कोकण गृहनिर्माण मंडळ यांच्या अखत्यारीतील गृहनिर्माण वसाहतींच्या आवारात वृक्षरोपण करता येईल याचा अभ्यास करावा. या दोन्ही मंडळांनी प्रत्येकी ५० हजार व २५ हजार वृक्षांचे रोपण करण्याचा संकल्प यावेळी जयस्वाल यांनी मांडला.

### गोखले पुलाचा वापर झोपण्यासाठी

**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

अंधेरी पूर्व आणि पश्चिमेला जोडणारा गोपाळकृष्ण गोखले पूल एका महिन्यापूर्वी प्रवाशांच्या सेवेत दाखल झाल्यामुळे प्रवाशांना दिलासा मिळाला. मात्र, रस्त्यावर झोपणाऱ्या बेघरांमुळे प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. गोखले पुलावरील एस. व्ही जंक्शन येथे बेघरांनी अतिक्रमण करून पुलाचा झोपण्यासाठी वापर सुरू केला आहे. गोपाळकृष्ण गोखले पूल जीर्ण झाल्यामुळे २०१८ पासून वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता. पुनर्बांधणीतील रखडपट्टीमुळे अनेक वर्षे नागरिकांना नवीन पुलाची प्रतीक्षा लागली होती. पुलाची पुनर्बांधणी करताना गोखले पूल बर्फीवाला पुलाला जोडण्यासाठी उंची वाढवण्यात आली होती. मात्र, दोन्ही पुलांच्या उंचीत अंतर पडल्याने काम आणखी रखडले.

### एनडीआरएफ, एसडीआरएफ दलांच्या व्यवस्थेसाठी दीड कोटी

**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

पावसाळ्यातील संभाव्य पूरस्थिती आणि भूस्खलनाच्या घटनांत तातडीच्या मदतीसाठी तैनात राज्य आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलांच्या व्यवस्थेसाठी दीड कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. राज्यातील दहा जिल्ह्यांसाठी प्रत्येकी १५ लाखांचा निधी देण्यात आला आहे. राज्यात पूरप्रवण जिल्ह्यांत राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची एकूण बारा पथके तैनात आहेत. पूरप्रवण तसेच भूस्खलनप्रवण जिल्ह्यांत या दलाच्या तुकड्यांना तैनात केले जाते. या प्रतिसाद दलाच्या पथकांना तैनातीदरम्यान खानपान, निवास व्यवस्था व इतर खर्चाकरीता संबंधित जिल्ह्यांना निधी देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. एकूण दीड कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, सांगली, सातारा, नांदेड आणि गडचिरोली या दहा जिल्ह्यांना प्रत्येकी पंधरा लाखांचा निधी मंजूर केला आहे. त्यांना प्रवासासाठी पूर्णवेळ वाहने उपलब्ध करून देण्याची जबाबदारी पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांवर सोपवण्यात आली आहे.

### चेंबूरमध्ये बेवारस इसमाचा मृत्यू

**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

चेंबूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत चेंबूर कॅम्प जामा स्वीटच्या समोरील रस्त्यावर एक ५० वर्षीय इसम बेशुद्ध अवस्थेत आढळला होता. चेंबूर पोलिसांनी त्याला उपचारासाठी घाटकोपरच्या राजावाडी रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी त्याला तपासले असता मयत घोषित केले. पोलिसांनी त्याच्या नातेवाईकांचा शोध घेतला असता कोणतीही माहिती मिळून आली नाही.

